



दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक ४० वा ● बुधवार २६ जून २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 40 | Date : 26/06/2024 blow Wednesday Page 4 Price 4

## विरोधी पक्षनेतेपदी राहुल गांधींची नियुक्ती



**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज :** काँग्रेस नेते आणि रायबरेलीचे खासदार राहुल गांधी हे लोकसभेतील विरोधी पक्षनेतेपदी नियुक्ती करण्यात आली आहे. काँगेसचे सरचिटणीस के.सी. वेणुगोपाल यांनी मंगळवारी रात्री ही माहिती दिली. मंगळवारी राहुल गांधी यांनी लोकसभेचे सदस्य म्हणून शपथ घेतल्यानंतर काँग्रेसने त्यांची विरोधी पक्षनेतेपदी नियुक्ती केल्याचे जाहीर केले. विरोधी पक्षनेतेपदी कोणाची नियुक्ती करावी याबाबत काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या निवासस्थानी इंडिया आघाडीची बैठक झाली. या बैठकीत राहुल गांधी यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. राहुल गांधी यांची विरोधी पक्षनेतेपदी नियुक्ती करण्यात आल्याची माहिती प्रोमेट स्पीकर यांना पत्रद्वारे कळवण्यात आले आहे. याआधी सोमवारी काँग्रेसच्या बैठकीत राहुल गांधी यांना लोकसभेत विरोधी पक्षनेते करण्याची मागणी करण्यात आली होती. काँग्रेस वर्किंग कमिटीच्या सदस्यांनी तसा प्रस्ताव देखील मंजूर केला होता. दरम्यान, लोकसभेतील विरोधी पक्षनेतेपदाबाबत विचार करण्यासाठी आपल्याला थोडा वेळ हवा असल्याचे राहुल गांधी यांनी म्हटले होते. नवी दिल्लीत सुरू असलेल्या संसदेच्या अधिवेशनात विजयी झालेले उमेदवार खासदारकीची शपथ घेत आहेत. मंगळवारी राहुल गांधी **। पान २ वर**

# महाराष्ट्रात लाडकी बहीण; गरीब महिलांना दरमहा १२०० ते १५०० रुपये

मुंबई : लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर सावध झालेल्या राज्यातील महायुती सरकारने आगामी विधानसभा निवडणुकीतील विजयासाठी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून मध्य प्रदेशच्या धर्तीवर महाराष्ट्रात गरीब महिलांसाठी 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजना राबवण्याच्या हालचाली सुरू आहेत. याअंतर्गत गरीब महिलांना दरमहा १२०० ते १५०० रुपये दिले जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे. यामुळे सरकारच्या तिजोरीवर वार्षिक १५ ते २० हजार कोटींचा आर्थिक भार पडणार असल्याची माहिती मंत्रालयातील सूत्रांनी दिली.आगामी विधानसभा निवडणुका जिंकण्यासाठी महायुती सरकारने कंबर कसली आहे. त्यासाठी समाजातील विविध घटकांसाठी नव्या आकर्षक योजना आणण्याची तयारी सुरू आहे. विशेषत: महिला आणि तरुणांच्या मतपेढीवर डोळा ठेवून त्यांना खूश करण्यासाठी दोन मोठ्या योजनांची आखणी सुरू आहे. राज्यातील महिलांची मने आणि मते जिंकण्यासाठी मध्य प्रदेशच्या धर्तीवर राज्यात 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजना राबविण्याचे नियोजन आहे. या योजनेबाबत माहिती घेण्यासाठी सरकारने अधिकाऱ्यांचे एक पथक अलीकडेच मध्य प्रदेशला पाठविले होते.

या पथकाने योजनेचा अभ्यास केल्यानंतर त्याआधारे 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजना तयार करण्याचे काम प्रगतिपथावर असल्याचे समजते. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात याची घोषणा केली जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.गतवर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीपूर्वी मध्य प्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी 'मुख्यमंत्री लाडली बहना' ही योजना आणली. त्या निवडणुकीत सर्व अंदाज खोटे ठरवत भाजपने राज्यात पुन्हा बहुमत मिळविले. अलीकडेच झालेल्या लोकसभा निवडणुकीतही मध्य प्रदेशने २९ पैकी २९ जागा भाजपच्या पारड्यात टाकल्या. या दोन्ही विजयांमागे 'लाडली बहना योजना' कळीची ठरल्याचे मानले जाते. आता हेच प्रारूप राज्यात राबविण्याची तयारी शिंदे सरकारने केली आहे.

**योजना काय?**

*** महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य तसेच त्यांच्या आरोग्याची काळजी घेतानाच गरीब महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी योजना. * पहिल्या टप्प्यात दारिद्र्यरेषेखालील ९० ते ९५ लाख महिलांना महिन्याला १२०० ते १५०० रुपये. * दारिद्र्यरेषेखालील २१ ते ६० वर्षे वयोगटातील महिला, तसेच विधवा, परितक्त्या, घटस्फोटितांना लाभ. ¢ रक्कम प्रत्येक महिन्याला लाभार्थीच्या बँक खात्यात थेट जमा.**

## शासकीय महापूजेसाठी मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांना मंदिर समितीच्या वतीने निमंत्रण : सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर



**पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज:** प्रत्येक वर्षी आषाढी यात्रा दरवर्षी आषाढी यात्रा शुद्ध एकादशी या दिवशी भरते सन २०२४ यावर्षी आषाढी यात्रा बुधवार दिनांक १७ जुलै २०२४ रोजी आहे या दिवशी पहाटे २.३० वाजता मुख्यमंत्री महोदय व मानाचे वारकरी यांच्या हस्ते सह पत्नी श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची शासकीय महापूजा करण्यात येणार असून या महापूजेचे निमंत्रण मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांना आज दिनांक २५ जून रोजी सह्याद्री अतिथी ग्रह मुंबई येथे मंदिर समितीकडून देण्यात आली की माहिती मंदिर समितीचे सहा अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली

यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजित पवार ग्रामविकास मंत्री गिरीश महायन तसेच मंदिर समितीच्या सदस्या शकुंतला नडगिरे ह भ प ज्ञानेश्र्वर देशमुख **। पान २ वर**

## आ. समाधान आवताडे यांची आज दुध उत्पादक व दुध संकलन संस्थाचालकांसमवेत बैठक

**मंगळवेढा/दैनिक यशसिध्दि न्यूज** तालुक्यातील सर्व दुध उत्पादक व दुध संकलन संस्थाचालकांसमवेत मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांची आज बुधवार दिनांक २६ जून २०२४ रोजी दुपारी २.०० वाजता लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय मंगळवेढा येथे बैठक आयोजित करण्यात आली आहे.



सदर बैठकीमध्ये दूध उत्पादक व दूध संकलन संस्थाचालकांच्या विविध अडी-अडचणी, दुध दर व इतर विविध विषयांवर आमदार आवताडे हे संवाद साधणार आहेत. तालुक्यातील अनेक शेतकरी व दूध उत्पादक पशुपालकांचे दूध व्यवसाय हे दैनंदिन उदरनिर्वाहाचा प्रमुख जोडधंदा म्हणून ओळखला जातो. त्यामुळे या व्यवसायावर आपली उपजीविका भागवणाऱ्या दोन उत्पादकांना व दूध संकलन संस्थाचालकांच्या यावेळी असणाऱ्या विविध समस्या आमदार आवताडे हे जाणून घेणार आहेत. तरी या बैठकीसाठी तालुक्यातील सर्व दूर उत्पादक व दूध संकलन केंद्र करणाऱ्या संस्थाचालकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आमदार समाधान महादेव आवताडे जनसंपर्क कार्यालय मंगळवेढा यांनी केले आहे.

## देशाचे तुकडे करण्याचा जे प्रयत्न करतील, त्यांचेच तुकडे होतील : केंद्रिय राज्यमंत्री रामदास आठवले

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज :** महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारत देशाचे संविधान लिहुन देशाची एकता आणि लोकशाही मजबुत केली आहे.देशातर्गत छोटे-मोठे भांडणे होतात.मात्र या देशात काणी फुट पाडु शकत नाही.या देशाचे तुकडे करण्याच जो काणी विचार करेल त्याचेच तुकडे होतील.देशाचे संविधान मजबुत असल्यामुळे देशाची एकता,अखंडता,लोकशाही मजबुत राहणार आहे.असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी केले. रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केंद्रीय राज्य मंत्री पदाची हॅट्रीक मारल्यानंतर त्यांचा पहिला जाहिर सत्कार करण्याची संधी नाशिककरांना मिळाली.रिपब्लिकन पक्षाचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष प्रकाश लोंढे **। पान २ वर**

### तिसऱ्यांदा केंद्रियराज्यमंत्री झाल्या बद्दल रामदास आठवले यांचा नाशिककरांनी केला सत्कार




# नीट पेपर फुटीचे कनेक्शन लातूर मार्गे माढा, अक्कलकोट व्हाया उमरगा आय.टी.आय ते नवी दिल्ली



### दोन शिक्षकांसह चौघांविरोधात गुन्हा दाखल

यासोबतच परीक्षा आणि उमेदवारांसंदर्भात अनेक व्हॉटसअॅप चॅट आढळले. जलिलखान पठाण याने संजय जाधवला काही प्रवेशपत्रांच्या प्रती आणि आर्थिक व्यवहारासंदर्भात व्हॉट्सअप मेसेज पाठवल्याचे दिसून आले. संशयित संजय जाधव याने पैशांच्या मोबदल्यात परीक्षा पास करण्याचे आश्र्वासन दिले होते. अनेक विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे इरन्ना मष्णाजी कोनगलवार (नेमणूक औद्योगिक प्रशिक्षण संस्था, उमरगा, जि. धाराशिव) यास व्हॉट्सअॅपद्वारे पाठवल्याचे कबूल केले.

### नीट परीक्षेत घोटाळा व प्रश्नपत्रिकांची खरेदी-विक्री सुरू होती तेव्हा देशातील सरकारी यंत्रणा झोपा काढीत होत्या काय?

की सीबीआय व ईडी सारख्या यंत्रणा फक्तविरोधकांना ब्लॅक मेल करण्यासाठीच सरकारने ठेवल्या आहेत? देशाला विश्र्वगुरू बनवण्याच्या बाता हे सरकार मारते ; पण नीट सह सर्वच स्पर्धा परीक्षांचे पेपर फोडून व विकून आपण विश्र्वगुरू होणार आहोत काय ? नीट परीक्षेत पैशांचा बाजार मांडून टॉपर्सचा बेसुमार पाऊस पाडण्यात आला . सीबीआय चौकशी होत राहील ; पण नीटमधील या दुकानदारीचा जाब शिक्षणमंत्र्यांना व स्वयंघोषित विश्वगुरूलाही द्यावाच लागेल ! **असंख्य, खाजगी शिक्षक**

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/महेश गायकवाड :नीट स्पर्धा परीक्षा घोटाळ्याचे कनेक्शन लातूर मार्गे माढा आणि अक्कलकोट व्हाया उमरगा आयटी आय ते नवी दिल्ली असे निघाले असुन या तीन ही ठीकानामधून तीन शिक्षकांना नांदेड येथील ए टी एस ने ताब्यांत घेतले आहे. यांमुळे माढा,अक्कलकोट आणि उमरगा येथे खळबळ उडाली आहे.

वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेशासाठी घेतल्या जाणाऱ्या नीट परीक्षेत गैरव्यवहार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. यामुळे संपूर्ण देशभरात खळबळ उडल्याचे पाहायला मिळत आहे. नीट स्पर्धा परीक्षा मध्ये झालेल्या घोटाळा प्रकरणी आता तीन जणांना अटक करण्यात आली आहे यातील एक जण लातूर दुसरा सोलापूर जिल्हयातील माढा तालुक्यांतील आहे तर तिसरा उमरगा येथील आय टी आय चा कर्मचारी आहे. त्यापैकी संजय जाधव हा सोलापुरातील माढ्याच्या प्राथमिक शाळेत गेल्या वर्षभरापासून उपशिक्षकाचं काम करत होता. जिल्ह्यातील शाळेत असणाऱ्या उपशिक्षकाचं नाव नीट परीक्षा कनेक्शनमध्ये आल्यानं माढा तालुक्याच्याच नव्हे तर जिल्ह्याच्या शिक्षण विभागातही खळबळ माजली आहे. त्यानंतर आता नीटच्या पेपरफुटीप्रकरणी लातूर कनेक्शन उघड झाले होते. नीट परीक्षेतील घोटाळ्याचे महाराष्ट्रातील धागेदोरे उघड झाल्यानंतर आता ४ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर एका शिक्षकाला अटक करण्यात आली. नीट परीक्षेतील घोटाळ्याप्रकरणी शनिवारी ताब्यात घेतलेल्या लातुरातील दोन शिक्षकांना चौकशीनंतर रात्री उशिरा सोडून देण्यात आले होते. त्यांच्या सुटकेला १२ तासही उलटत नाहीत, तोच रविवारी पुन्हा एक शिक्षकाला अटक करण्यात आली. नीटमध्ये अधिकचे गुण मिळवून देण्यासाठी लातूरचे दोन जण काम करत असल्याचे एटीएसच्या प्राथमिक चौकशीत स्पष्ट झाले आहे. त्यामुळे या दोन शिक्षकांसह धाराशिव आणि दिल्ली येथील एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**लातूरच्या शिवाजीनगर पोलिसात गुन्हा दाखल**

लातूरच्या शिवाजीनगर पोलिसात हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लातूरमधून धाराशिवला हे पैसे पाठवण्यात आल्याचे बोललं जात आहे. त्यानंतर धाराशिवमधून दिल्लीला हे पैसे पाठवण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. लातूर येथील संजय तुकाराम जाधव (४०, जि. प. प्राथमिक शाळा, टाकळी, ता. माढा) आणि जलिलखान उमरखान पठाण (३४, मुख्याध्यापक, जि. प. प्राथमिक शाळा, कातपूर, ना. जि. लातूर) हे दोघे नीट परीक्षेत गैरव्यवहार करत होते. हे दोघेही उमेदवारांना परीक्षा पास करुन देण्याचे रॅकेट चालवत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानंतर नांदेडच्या दहशतवाद विरोधी पथकाचे पथकाने लातुरातून जाधव आणि पठाण यांना शनिवारी ताब्यात घेऊन त्यांची रात्री उशिरापर्यंत चौकशी करून सोडून दिले होते. पठाणला रात्री अटक झाली आहे. एटीएसने त्यांचे मोबाईल तपासले असता धक्कादायक माहिती समोर आली. त्यांच्या फोन गॅलरीमध्ये १२ वर विद्यार्थ्यांच्या परीक्षा पवेश पत्रांच्या प्रती आढळल्या. संजय जाधव याच्या माहितीनुसार इरन्ना कोनगलवार हा पुढे दिल्ली येथील एका गंगाधर नावाच्या व्यक्तीच्या माध्यमातून वैद्यकीय शिक्षणासाठी घेण्यात आलेल्या नीट-२०२४ परीक्षेमध्ये पैशाचे मोबदल्यात प्रवेश मिळून देण्याचे अवैध काम करीत आहे. प्राथमिक चौकशीत दोषी आढळताच दहशतवाद विरोधी पथकाच्या वतीने लातुरातील दोन शिक्षकांसह चौघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## संपादकीय

### संवेदना गोठल्याचे निदर्शक..

वसईत घडलेली घटना तर माणुसकीला शरमेने मान खाली घालायला लावणारी आहे. सहा वर्षे जिच्यावर जिवापाड प्रेम केले, तिच्याच डोक्यात पान्याचे घाव घालताना प्रियकराचा हात थरथरला नाही. पोलीस तपास होईल, त्यामागचे निश्चित कारणही समोर येईल. पण अनावर झालेल्या रागाने एका निष्पाप तरुणीचा बळी घेतला त्याचे काय? संबंधांमध्ये वितुष्ट जरी आले तरी, ते सामंजस्याने किंवा दुसऱ्या एखाद्या जबाबदार व्यक्तीच्या मध्यस्थीने त्यातून मार्ग काढता येऊ शकतो, असा विचार तो करू शकला नाही, हे खेदजनक आहे. गैरसमज आणि संशय हे दोन व्यक्तींमधील संबंधांचे मोठे शत्रू असतात, ते दबा धरून बसलेले असतात, त्यांच्यापासून दोघांनी फार सावध राहावे लागते. अव्यक्त प्रेम आणि अतिरेकी प्रेम याचा शेवट असा भयावह होऊ शकतो, याचा प्रत्यय अनेकदा आला आहे. वसई पूर्वेच्या वालीव येथे आरती यादव या २२ वर्षीय तरुणीची २९ वर्षीय रोहित यादव याने भर रस्त्यात केलेली हत्या अतिरेकी प्रेमाचे स्पष्ट उदाहरण आहे. साधारणपणे दोन वर्षांपूर्वी नवी दिल्लीत श्रध्दा वालकर हिची हत्या असो वा गेल्यावर्षी मीरा रोड येथील सरस्वती वैद्य हिची हत्या असो, या घटनाही त्याच पठडीतील आहेत. आपल्या जीविताला धोका निर्माण होऊ शकतो, याची पुसटशीही कल्पना श्रध्दा, सरस्वती आणि आरती यांना आली नसावी का? तसे संकेत मिळाले असतील तर, मग त्या सावध का झाल्या नाहीत? या नाण्याची दुसरी बाजू ही की, आता नकार पचविणेसुध्दा जड होत चालले आहे. मुलीकडून नकार येताच, पुरुषी अहंकार जागा होतो आणि त्याचे पर्यवसान गंभीर गुन्ह्यातच होते. कल्याणमध्ये एका २५ वर्षीय तरुणाने एकतर्फी प्रेमातून बारा वर्षीय मुलीची हत्या केली. सर्वात गंभीर म्हणजे, त्याने मुलीच्या आईसमोरच तिच्यावर चाकूने सात ते आठ वार केले. या सर्व घटनांचा मथितार्थ एकच आहे तो म्हणजे, मानवी संवेदना बोथट होत चालल्या आहेत. पृथ्वीतलावरील सर्व प्राण्यांमध्ये मनुष्यप्राणी श्रेष्ठ गणला जात असला तरी, त्याच्या या कृती पशुत्वापेक्षाही हीन आहेत. आरती हिच्या हत्येच्या वेळी आजूबाजूला लोक होते. त्यातल्या अनेकांनी बघ्याची भूमिका घेतली. वसईत डोळ्यादेखत गुन्हा घडत असताना एकाही व्यक्तीचे रक्त उसळले नाही, हे संवेदना गोठल्याचे निदर्शक आहे.

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५० व्या जयंती निमित्त प्रासंगिक लेख

## लोकराजा छत्रपती शाहू महाराज यांचा जन्म दिवस प्रत्येक व्यक्तीने सणाप्रमाणे साजरा करावा : डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**प्रथमतः मी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५० व्या जयंती निमित्त आपण सर्वांना कोटी कोटी सदिच्छा! व्यक्त करतो. या निमित्ताने त्यांचा संदेश आपल्यापर्यंत पोहचवण्यासाठी या लेखाद्वारा माध्यमातून अभिवादन करतो.**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे सामाजिक भान असलेले कृतीशील लोकराजे होते. त्यांचा जन्म २६ जून १८७४ ला झाला होता. त्यांनी आपल्या संस्थानात राबविलेल्या लोककल्याणकारी उपाययोजनांची आजही तेवढीच नितांत आवश्यकता आहे. समतामय निकोप समाज निर्माण करण्यासाठी सर्व हितचिंतकांनी आपली भूमिका पार पाडण्याची नितांत आवश्यकता आहे.



महार वतन रद्द करण्याच्या हेतूने शाहू महाराजांनी घेतलेल्या भूमिकेवर बोलताना गळा कापला व खोकला हटला. अशी महार वतन खालसा समितीचे उपदेशक बळवंत नारायण शिंगे यांनी आपली प्रतिक्रिया प्रशासनाला कळविली होती. अस्पृश्य लोकांमध्ये सुधारणा व्हावी म्हणून त्यांच्यासाठी शाहू महाराजांनी वस्तीगृहे काढलीत, शिक्षणासाठी विद्या मंदीरे खुले केलीत, कित्येकांना नोकऱ्या दिल्यात एवढेच नव्हे! तर पन्नास टक्के आरक्षणाचे आदेश काढून अंमलबजावणी करण्याची सुरुवात केली. काहींना वकिली सारख्या व्यवसायात स्थिरावता यावे म्हणून सहकार्य केले. गंगाराम कांबळे सारख्या अस्पृश्य व्यक्तिला चहाचे हॉटेल चालविण्यासाठी अर्थ सहाय्य केले, एवढेच नव्हे! तर ते हॉटेल चालावे म्हणून ते स्वतः चहा पिण्यासाठी समूहासह तिथे जात असत. अशाप्रकारे स्पृश्यास्पृश्यतेचा भेद बाजूला ठेवून त्यांच्या संस्थानात समतामुलक समाज निर्माण करण्याचा त्यांनी कृतीशील प्रयत्न केला आहे.

८ जानेवारी १९२० रोजी मुंबईच्या भायखळा येथील पिवळी माडी येथे नारायण चंदावरकर यांच्या अध्यक्षतेखाली बहिष्कृत वर्गाची सभा संपन्न झाली होती. ज्यात प्रामुख्याने दोन ठराव घेण्यात आले होते. पहिला म्हणजे कायदे कौन्सिलात बहिष्कृत वर्गाला त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळावेत. आणि त्यांची निवड ही त्यांच्याच संघामार्फत व्हायला हवी. तसेच दुसऱ्या क्रमांकाचे ठरावात शाहू छत्रपती कोल्हापूर यांनी बहिष्कृत वर्गाच्या उन्नतीसाठी चालविलेल्या प्रयत्नाबद्दल त्यांचे आभार मानण्याचे ठरविण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर दक्षिण महाराष्ट्रातील बहिष्कृत वर्गाची परिषद म्हणजे कागल संस्थानातील माणगांव परिषद होय, जी २१ व २२ मार्च १९२० ला संपन्न झाली. या परिषदेला लोकांनी उपस्थित राहू नये म्हणून तलाठी, कुलकर्णी यांसारख्या उच्च वर्णियांनी इतरांची मने कलुषित करण्यासाठी विष पेरण्याचे काम केले होते. तरीही सुधारणावादी ब्राह्मणासह कोल्हापूर दरबारातील वरिष्ठ दर्जाची व बहिष्कृतांचे हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मात्र या परिषदेला बहिष्कृत वर्गासाठी काम करणाऱ्या संघटना व डिप्रेस्ड क्लास मिशनचे प्रतिनिधी उपस्थित नव्हते! हे उल्लेखनीय होय.

या परिषदेच्या पहिल्या दिवशी स्वागताध्यक्ष दादासाहेब राजेसाहेब इनामदार म्हणाले की, हल्लीच्या स्वराज्याच्या काळात इतर लोक आपले बरे करतील असे समजून त्यांच्यावर अवलंबून राहण्यापेक्षा आपल्या स्वजनोद्धाराचे महत्कार्य आपण स्वतःच केले पाहिजे.

पुढे या परिषदेत बोलताना अध्यक्ष भीमराव आंबेडकर म्हणाले की, बहिष्कृत वर्गात दिसून येणारी विचार क्रांती ही अपूर्व आहे. आजपर्यंत लोकांना आपल्या दुरावस्थेचे कारण हे दुर्भाग्य आहे, असे वाटत होते. आता मात्र हा ईश्वरी लिलेचा पाक नसून इतरांच्या दुष्कृत्यांचा परिणाम असल्याची जाणीव होते, ही परिवर्तनाची नांदी होय. त्या काळातील हिंदू धर्माच्या व्यवहारानुसार जन्मसिद्ध योग्ययोग्यता व पवित्रापवित्रता या दोन तत्त्वान्वये हिंदू लोकांची विभागणी केली तर जन्माने श्रेष्ठ व पवित्र मानला जाणारा वर्ग म्हणजे ब्राह्मण होय. तर ज्याची जन्मसिद्ध श्रेष्ठता व पवित्रता ब्राह्मणापेक्षा कमी दर्जाची आहे, असा वर्ग म्हणजे ब्राह्मणेत्तर वर्ग होय. तसेच जन्मसिद्ध कनिष्ठ व अपवित्र अशांचा समूह म्हणजे बहिष्कृत वर्ग होय. अशा जन्मसिद्ध विषमतावादी वर्गीकरणाचे गुणहीन ब्राह्मणांचे देखील कल्याण झाले आहे. ब्राह्मणेत्तरास मात्र जन्मसिद्ध अयोग्यतेचा भार सहन करावा लागल्यामुळे त्यांच्यातील आत्मभान व स्वाभिमान लोप पावत चालले होते. ज्यामुळे सामाजिक व आर्थिक दृष्ट्या ते दूर्बल झालेत. व्यापार, नौकरी व शेती यासारख्या धनसंचयाचे मार्ग बंद असल्याने त्यांच्या विकासाची नाकेबंदी झाली होती.

बहिष्कृत वर्गातील लोकांत नैसर्गिक गुण असल्याचे सर्व जण मान्य करत असले तरी सामाजिक परिस्थिती अनुकूल नसल्याने त्यांच्या प्रगतीला आळा बसत होता. म्हणून या समुदायाला राजकीय सामर्थ्य मिळविण्यासाठी जातवार प्रतिनिधित्व प्राप्त होण्याची आवश्यकता भिमराव आंबेडकरांनी व्यक्त केली होती. अन्यथा 'सत्यमेव जयते' हे तत्त्व पोकळ असल्याचे सिद्ध होईल. करिता सत्याचा जय होण्यासाठी आपण संघटीतपणे चळवळीच्या माध्यमातून संघर्ष करून लढा दिला पाहिजे.

दुसऱ्या दिवशी परिषदेत बोलताना शाहू महाराजांनी आंबेडकरांच्या भाषणाचा लाभ मिळावा म्हणून ते उपस्थित असल्याचे सांगून डॉ. आंबेडकर हे सर्व मागासवर्गीय जातीचा परामर्श घेतात, याबद्दल त्यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले. ब्रिटिश काळात बहिष्कृत वर्गातील लोकांनी दररोज हजेरी द्यावी लागत असे. ज्यामुळे या गरीब लोकांवर गांवकामगार व इतर अधिकारी फारच जुलूम व अन्याय करीत असत. कधी कधी तर हे अधिकारी, या लोकांना गैरहजेरीची भीती दाखवून फुकट काम करवून घेत असत. परिणामी त्यांच्या जवळचे नातेवाईक आजारी पडले तरी त्यांना भेटायला जाता येत नसत, एवढेच नव्हे! तर आजारी मुलांच्या आई वडिलांना जबरदस्तीने उचलून नेल्यामुळे परत आल्यावर त्यांना त्यांच्या मुलांचे मृत प्रेत पहायला मिळत होते, एवढी जुलमी सत्ता तेव्हा होती. तसेच हजेरीच्या लोकांपेक्षा बिनहजेरीच्या लोकांतच गुन्हेगारांची संख्या जास्त असल्याचे शाहू महाराजांनी नमूद केले आहे. ज्यामुळे बहिष्कृतांची अबरू व प्रतिष्ठा पणाला लागली होती. त्याचे बहिष्कृतांवर दूरगामी परिणाम झालेत. हे ध्यानात घेऊन शाहू महाराजांनी हजेरी प्रथा बंद केली. परिणामी गुन्ह्यांची संख्या कमी झाल्याचे व बलुतेदारांची भांडणे आणि मारामाऱ्या बंद झाल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. म्हणून त्या काळातील वतनदारास व बलुतेदारांस शाहू महाराजांनी वतनदारी व बलुतेदारी सोडून देण्याची विनंती केली होती. या विनंतीस मान देऊन करवीरच्या महारांनी वतनदारी सोडून देण्याचे कबूल केले होते. याचे अनुकरण सर्वत्र केले जावे अशी अपेक्षा महाराजांनी याप्रसंगी व्यक्त केली होती.

या संदर्भात सातारा पोलीस सुप्रिटेंडंट मार्फत ब्रिटिश प्रशासनाने शाहू महाराजांना कळविले होते की, आजपर्यंतच्या हजेरीचे लोक निदान ब्रिटिश वगैरे पर हद्दीत जातील तेव्हा तरी त्यांना त्यांच्या संबंधाने आगाऊ वर्दी मिळावी. त्याला उत्तर देताना ४ जून १९१९ ला शाहू महाराजांनी कळविले होते की, ज्या अर्थी, मी हजेरी अजिबात माफ केली आहे; त्याअर्थी आपल्या इच्छेस मान देणे अशक्य झाले आहे. पण गुन्हेगार लोकांचे दाखले, मग ते स्पृश्य असोत की अस्पृश्य असोत, मी मोठ्या आनंदाने देत जाईन. जे खरोखरच चांगले पणाने वागणारे अस्पृश्य लोक आहेत, त्यांना जन्मभर गुन्हेगारांप्रमाणे वागविण्यास माझे अंतःकरण मला सांगत नाही. याप्रमाणे हजेरी बंद केल्याबद्दल त्यांनी आपल्या भावना प्रशासनास कळविल्या होत्या.

सदरील सत्कार्याची नोंद घेऊन बाबुराव यादव यांनी पुस्तिका लिहिली होती. तसेच या कामी त्यांना सत्यशोधक समाज, आर्य समाज व अमेरिकन मिशन सुद्धा सहकार्य करीत होते. याबद्दल शाहू महाराजांनी त्यांचे आभार व्यक्त केले. या परिषदेत शाहू महाराजांनी खंत व्यक्त केली होती ती अशी की, महार, मांग, चांभार, ढोर हे खरोखर वैश्य जातीचे लोक असून विशेषतः महार लोक पूर्वी महारकी सूत काढून व्यापार करीत असत. तर मग त्यांना अस्पृश्य कोणी ठरविले असेल? असा वैश्यांचा धंदा सोडून दस्यू म्हणजे नोकर व नोकर म्हणजे अतिशूद्र, असे असताना अस्पृश्यांनी हा धंदा का स्विकारला असेल? असा प्रश्न त्यांनी विचारला होता. आपलपोटी मंडळी अयोग्य पुढारी नेमून देऊन अज्ञानी लोकांना फसवितात. अस्पृश्यांना मनुष्याप्रमाणे वागविल्याशिवाय राजकारण कसे होणार? ज्यांना राजकारण करावयाचे आहे, त्यांनी मनुष्याला मनुष्याप्रमाणे म्हणजे इतर देशांत वागवितात त्याप्रमाणे वागविले पाहिजे. जो असे वागविल त्यांनीच देश कार्य केले, असे म्हणता येईल. करिता केवळ तोंडाने बडबड करणारे पुढारी नको आहेत तर कृतीने जातिभेद मोडून आम्हाला मनुष्याप्रमाणे वागवितील असे पाहिजेत. म्हणून आंबेडकरांना 'पंडित' ही पदवी बहाल करून आपण त्यांचे नेतृत्व स्विकारले पाहिजे. तेच आपला पुढील काळात उद्धार करणार आहेत. डॉ. आंबेडकर हे केवळ अस्पृश्यांचेच नव्हे! तर संपूर्ण भारताचे पुढारी होतील. अशा भावना व्यक्त करून डॉ. आंबेडकरांना रजपूतवाडिच्या कॅम्पवर भोजनाला येण्याचे निमंत्रण दिले होते.

वतनी नौकरी हे दुसरे तिसरे काही नसून एक प्रकारची बेठबिगारीच होती. लाकडे फोडणे, जनावरांची प्रेते वाहणे, गलिच्छ कामे करने इत्यादी. या वतनी नौकरीतून मुक्त केल्यास शुद्रतेचा व अस्पृश्यतेचा डाग कालांतराने नाहिसा होणार या आशेपोटी वतनी जमिनीचा रयतावा करण्यासाठी २७ जुलै १९२१ ला काही महार लोकांनी छत्रपती शाहू महाराजांकडे अर्ज सादर केला होता. तो अर्ज रजपूतवाडी कॅम्पमध्ये ५ आगष्ट १९२१ ला तात्काळ मंजूर करून तसा आदेश पारीत केला होता.

या परिषदेत एकूण पंधरा ठराव मंजूर करण्यात आले होते. त्यातील ठराव क्रमांक दोन आणि ८ जानेवारी १९२० च्या भायखळ्याच्या सभेतील ठराव क्रमांक दोन प्रमाणे श्रीमंत महाराज शाहू छत्रपती सरकार इलाखा करवीर यांनी आपल्या राज्यात बहिष्कृतांना समानतेचे हक्क देऊन त्यांचा उद्धार करण्याचे सत्कृत्य सुरू केल्याबद्दल त्यांचा जन्म दिवस प्रत्येक बहिष्कृत व्यक्तीने सणाप्रमाणे साजरा करावा. असे त्या परिषदेने मत होते. म्हणून डॉ. आंबेडकरांच्या या आदेशाचे पालन करून भारतातील प्रत्येक नागरिकाने सामाजिक भान जपणाऱ्या लोक राजा राजर्षी शाहू महाराज यांचा जन्म दिवस सणाप्रमाणे साजरा करावा. करिता आपण सर्वांना या १५० व्या जयंती निमित्त कोटी कोटी सदिच्छा. तसेच शाहू महाराजांना विनम्र अभिवादन.

**लेखक : बी. बी. मेश्राम, अभ्यासक, संचालक : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल, नॅशनल कौन्सिल मेंबर आफ दि आल इंडिया नाग असोसिएशन (आईना) पर्क : ९४२१६७८६२८**

पान १ वरुन

### विरोधी पक्षनेतेपदी राहुल

यांनी शपथ घेतली. शपथ घेताना त्यांच्या हातात संविधानाची पत्र होती. शपथ पूर्ण होताच त्यांनी तेथे उपस्थित असलेल्या मार्शलशी देखील हस्तांदोलन केले होते. काँग्रेसने लोकसभा निवडणुकीत ९९ जागा जिंकल्या होत्या. मात्र राहुल गांधी दोन ठिकाणी विजय झाले होते आणि त्यांनी एका ठिकाणचा राजीनामा दिल्याने काँग्रेस खासदारांची संख्या ९८ इतकी आहे.

### शासकीय महापूजेसाठी मुख्यमंत्री

जळगावकर अँड माधवी निगडे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके व्यवस्थापक बालाजी कुदलवाड उपस्थित होते

यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा मंदिर समितीच्या वतीने सहा अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते विना व वारकरी फटका व श्री ची मूर्ती उपरणे चिपळ्या देऊन यथोचित सन्मान करण्यात आला तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री अजित पवार व ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांचाही सत्कार मंदिर समितीच्या वतीने करण्यात आला यावेळी मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी आषाढी यात्रा कालावधीत येणाऱ्या भाविकांसाठी देण्यात देण्यात येणाऱ्या सोयी सुविधा बाबत माहिती घेऊन आवश्यक त्या सुविधा दिल्या व आषाढी यात्रा कालावधी दर्शन रांग पत्राचे दर्शन मंडप येथे येणाऱ्या वारकरी भाविकांसाठी देण्यात देण्यात येणाऱ्या आवश्यक सोयी सुविधांची तसेच यात्रा कालावधीत भाविकांना सुलभ व जलद दर्शन व्हावे याबाबत केलेल्या नियोजनाची माहिती मंदिर समितीचे शहराध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर व मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिली

### देशाचे तुकडे करण्याचा ..

यांच्या नेतृत्वात नाशिकमधील महाकवी कालिदास कलामंदिर येथे तिसऱ्यांदा केंद्रिय राज्यमंत्री झाल्याबद्दल ना.रामदास आठवले यांचा नाशिक मध्ये रिपब्लिकन कार्यकर्त्यांच्या वतीने ,आंबेडकरी जनतेच्या वतीने आणि नाशिक च्या सर्व नागरिकांच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी नाशिक चे पालक मंत्री दादा भुसे आणि आमदार सीमा ताई हिरे रिपब्लिकन चे ज्येष्ठ नेते रमेश मकासरे , भूषणभाई लोंढे, दीक्षाताई लोंढे, विश्वनाथ काळे , चंद्रशेखर कांबळे, पागरे, विनोद जाधव आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

# बीबी ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना सुख सुविधा द्या...

## स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाउपाध्यक्ष सहदेव लाड यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी यांना निवेदन

**दैनिक यशसिद्धि न्यूज**

बुलढाणा / राहुल साबळे :बीबी ग्रामीण रुग्णालयात नियमित वैद्यकीय अधिकारी उपलब्ध करून देण्याची तसेच गेल्या कित्येक महिन्यापासून बंद पडलेली रक्त लघवी तपासणीची मशीन तात्काळ नवीन उपलब्ध करून देण्याची मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष सहदेव लाड यांनी जिल्हाधिकारी बुलढाणा व जिल्हा शैल्य चिकित्सक यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे,

बीबी येथील ग्रामीण रुग्णालय हे लोणार तालुक्यातील सर्वात मोठे ३० खाटांचे रुग्णालय आहे रुग्णालयामध्ये ३ अधिकारी कार्यरत असून त्यापैकी एक अधिकारी हे कॉन्ट्रॅक्ट बेस वर आहे

तर दुसरे एक अधिकारी हे बीबी येथे कार्यरत असताना ते बीबी येथे उपस्थित न राहता खामगाव या ठिकाणी ड्युटी करतात तर उर्वरित एक महिला अधिकारी ह्या नेहमी सुट्टीवर असतात गेल्या काही महिन्या अगोदर या रुग्णालयापासून जवळच असलेल्या खापरखेड घुले सोमठाणा या गावांमध्ये भगरी मधून काही लोकांना विषबाधा झाली असता शेकडो विषबाधा झालेल्या लोकांना ग्रामीण रुग्णालय बीबी येथे आणले असता त्या ठिकाणी एकही वैद्यकीय अधिकारी त्यावेळी उपस्थित नव्हता तर दुसरीकडे या रुग्णालयातील रक्त लघवी तपासणी मशीन ही गेल्या कित्येक महिन्यापासून बंद पडलेली आहे त्यामुळे रुग्णालयामध्ये आलेल्या रुग्णांना खाजगी लॅबमधून रक्त लघवी तपासून आणावी लागते त्यामुळे गोरगरीब रुग्णावर याचा फार मोठा भुर्दंड पडत आहे तरी येत्या १,जुलै पर्यंत रुग्णालयात नियमित वैद्यकीय अधिकारी व रक्त लघवी तपासणी मशीन उपलब्ध करून न दिल्यास रुग्णालयामध्ये बेमुदत ठीय्या आंदोलन करण्याचा इशारा सुद्धा सहदेव लाड यांनी निवेदनाच्या माध्यमातून दिला आहे निवेदनावर कार्तिक धाईत, आणिल लांडगे, ऋषिकेश धाईत ,भागवत मुळे, तुषार मुर्तडकर ,उद्धव आटोळे ,राम डुकरे, चेतन ढाकणे ,सागर मुर्तडकर, अजय कायदे ,पांडुरंग कुलकर्णी ,यांच्या स्वाक्षऱ्या आहेत



हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांनी सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# नळदुर्गच्या ऐतिहासिक किल्ल्यातील यूनिटी मल्टीकॉन कंपनीने केलेली कामे पर्यटकांच्या डोळ्यांची पारणे फेडणारी : शहबाज काझी

## नळदुर्ग येथे यूनिटी मल्टीकॉन कंपनीचा दशकपुर्ती सोहळा संपन्न

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : नैसर्गिक आपत्तीला तोंड देत नुकसानाची पर्वा न करता कोट्यावधी रुपये खर्चुन नळदुर्गच्या भुईकोट किल्ल्याचे सुशोभिकरण करुन कायापालट केले. इतिहास प्रेमी नागरिक व येणा-या पर्यटकांना ऐतिहासिक वास्तुची माहिती व्हावी या हेतुनी अवाढव्य किल्ल्यात सुशोभिकरण व सोयी सुविधा निर्माण करण्यात प्रारंभीचे चार वर्ष गेले. त्यानंतर कोरोनात दोन वर्ष गेले. तर अतीवृष्टीत किल्लयात खुप मोठे नुकसान झाले. त्याचबरोबर नाम मात्र उत्पन्न मिळाले तर खर्च आधिक झाले. सर्वाच्या सहकार्यामुळेच किल्ल्याचे पर्यटन क्षेत्रात नावलौकिक झाल्याचे मत युनिटी मल्टिकाँन्स कंपनीचे कार्यकारी संचालक कफिल मौलवी यानी स्नेह मेळाव्यात बोलताना व्यक्त केले.

सन १९१४ रोजी करारान्वये महाराष्ट्र सरकार व राज्य पुरातत्व विभाग यांनी नळदुर्गचा किल्ला दहा वर्षासाठी युनिटी मल्टीकॉन्स कंपनीला दत्तक म्हणून संवर्धन व संगोपनासाठी दिला. हा दहा वर्षाचा कालावधी संपत आल्याने नळदुर्ग येथिल युनिवंडर्स रिसार्ट याठिकाणी सोमवारी युनिटी कंपनीच्या वतीने स्नेह मेळावा आयोजित करण्यात आला होता यावेळी युनिटी मल्टीकॉनचे कार्यकारी संचालक कफिल मौलवी , संचालक जयधवल करकमकर यांनी उपस्थित मान्यवरांचा शाल बुके देऊन सत्कार करण्यात आला.

नळदुर्गच्या ऐतिहासिक किल्ल्यातील झालेली विकासाची कामे किंवा वृक्ष लागवड व पिण्याच्या पाण्याची सोय हे भविष्यात पर्यटकांसाठी टिकून राहावे यासाठी आणखी दहा वर्षे हा किल्ला महाराष्ट्र राज्य संरक्षित स्मारक संवर्धन योजनेअंतर्गत महाराष्ट्र सरकार व पुरातत्व विभागाने सध्या या किल्ल्याची संगोपन करण्याची जबाबदारी ज्या युनिटी मल्टीकॉन्स कंपनीकडे आहे. त्याच कंपनीकडे दत्तक देण्याची मागणी अनेक मान्यवरानी आपल्या मनोगतातुन व्यक्त केले.



युनिटीने किल्ला संगोपनासाठी घेतल्यानंतर गेल्या दहा वर्षात किल्ल्याचे प्राचीन व ऐतिहासिक महत्त्व अबाधित ठेवून पुरातत्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली अतिशय सुंदर व पर्यटक वाढीसाठी प्रामाणिक पणे प्रयत्न केले आहेत. दहा वर्षापूर्वीचा किल्ला आणि आजचा किल्ला यामध्ये खुपच बदल झालेला आहे. पूर्वी किल्ल्यात भग्नावस्था होऊन आखेरची घटका मोजत होता. मात्र आज त्याचे रूपडे पालटुन निसर्ग सौदर्याने नटलेला आहे. किल्ल्यात केलेल्या विकास कामामुळे युनिटी मल्टीकॉन्स कंपनीने किल्ल्यात हजारो वृक्ष लावून त्याची जोपासना केली आहे. त्यामुळे आज किल्ल्यात सर्वत्र हिरवी, वनराई दिसत आहे.वृक्ष लागवडी बरोबरच विविध जातीचे फुलझाडेही सर्वत्र लावण्यात आली आहेत. जागोजागी पर्यटकांसाठी शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय, स्वच्छतागृहांची सोय आहे युनिटीने किल्ल्यात केलेल्या कामामुळे आज नळदुर्गचा ऐतिहासिक व प्राचीन किल्ला पर्यटन क्षेत्राच्या नकाशावर आला असुन एक रोल माडल ठरला आहे. किल्ला पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत गेल्या दहा वर्षात लक्षणीय वाढ झाली आहे. हे सर्व टिकून राहण्यासाठी पुन्हा एकदा पुढील दहा वर्षासाठी हा किल्ला महाराष्ट्र सरकार व पुरातत्त्व विभागाने युनिटी कंपनीला संगोपनासाठी दत्तक देणे गरजेचे आहे या किल्ल्यातील नयनरम्य दृश्य पर्यटकांच्या डोळ्याची पारणे फेडणारा असून पर्यटक या दृश्या बघुन समाधान व्यक्त करतात

या कार्यक्रमास शहबाज काझी, कमलाकर चव्हाण, सुनिल बनसोडे , रघुनाथ नागणे, ज्योतीबा येडगे, प्रमोद कुलकर्णी , सुभद्राताई मुळे, कल्पनाताई गायकवाड , सुधीर हजारे, आविनाश नरवडे, शिवाजी गायकवाड , नितीन कासार , महालिंग स्वामी, संतोष पुदाले, धिमाजी घुगे, रमेश जाधव, वैजिनाथ कोरे, अमर भाळे, संजय जाधव, गोपाळ देशपांडे, मुश्ताक कुरेशी, शाम कनकधर , श्रमिक पोतदार, बसवराज धरणे, सरदारसिंग ठाकूर, शफी शेख , शरीफ शेख, आर पी आयचे बाबासाहेब बनसोडे, प्रा. डाँ. पाडूरंग पोळे, नळदुर्ग शहर पत्रकार संघटनेचे अध्यक्ष सुहास येडगे, विलास येडगे, तानाजी जाधव, दादासाहेब बनसोडे, आयुब शेख , लतीफ शेख, उत्तम बनजगोळे, शिवाजी नाईक आदीसह सर्वपक्षीय पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्तविक विनायक अंहकारी यानी तर आभार युनिटी मल्टीकॉन्स संचालक जयधवल करकमकर यानी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी युनिटीचे जुबेर काझी , रईस जाहागिरदार नितीन पवार निखिल येडगे

# वसतिगृहा तील विद्यार्थ्यांच्या मृत्यू प्रकरणी, संचालकांना,कारावासाची शिक्षा.

**दैनिक यशसिध्दि न्यूज**




देऊळगाव राजा/राजु भालेरावः ०८.०३.२०१४ रोजी फिर्यादी राजु रंगनाथ डोंगरे वय ३० वर्षे, रा. बाजीउम्रद ता.जि. जालना यांनी पोलीस स्टेशन देउळगांव राजा येथे रीपोर्ट दिला की, फिर्यादीचा मुलगा मृतक अक्षय राजु डोंगरे वय १० वर्षे, रा. बाजीउम्रद ता.जि. जालना हा आरोपींचे सिध्दीनिकेतन वस्तीगृहामध्ये राहण्यास होता व आरोपी क्र.१. रामप्रसाद नामदेव नागरे २. गजानन नागोराव आघाव दोन्ही रा. देउळगांव राजा हे वस्तीगृहाचे संचालक असुन फिर्यादीचा मुलगा आजारी असतांना त्यास वैद्यकीय उपचार करणे गरजेचे असतांना यातील आरोपीतांनी वैद्यकीय उपचार केले नाही. व त्यांचे कर्तव्यात निष्काळजीपणा व बेजबाबदार पणा करुन मृतक अक्षय राजु डोंगरे यास वैद्यकीय औषधोपचार पुरविले नाही, त्यामुळे तो मरण पावला. वरुन पोलीस स्टेशन देउळगांव राजा येथे आरोपीतां विरुध्द अपराध क्र.२०/२०१४ क. ३०४ (अ) भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल करुन तपास अधिकारी सपोनी किशोर जुनघरे यांनी सदर गुन्हयाचा तपास पूर्ण करुन आरोपी विरुध्द मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधीकारी, कोर्ट देउळगांव राजा येथे दोषारोप पत्र दाखल केले. सदर गुन्हयामध्ये वि. न्यायालयाने एकुण ०५ साक्षीदार तपासले. आरोपीतां विरुध्द कलम ३०४ (अ) भा.दं.वि. प्रमाणे सबळ पुरावा उपलब्द झाल्याने न्यायाधीश श्री. शैलेश कंठे, प्रथम वर्ग न्यायदंडाधीकारी कोर्ट-०१ ले, देउळगांव राजा यांनी दोन्ही आरोपीतांना ०२ वर्षे कारावासाची शिक्षा व प्रत्येकी १००० रु. दंड ठोठावला आहे. सरकार पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता अनिल शेळके यांनी तर कोर्ट पैरवी म्हणुन पो.नि. संतोष महल्ले ठाणेदार पोस्टे देउळगांव राजा यांच्या मार्गदर्शनाखाली महीला नापोकों जयश्री काकडे ब.नं. १९३८ यांनी काम पाहीले.



# विद्यार्थ्यांसाठी आवश्यक कागदपत्रे सुलभतेने देण्याचा शासनाचा उपक्रम : बाळासाहेब कदम

## रोपळे विद्यालयात दाखले वाटप शिबीर : विद्यार्थ्यांना २५० दाखल्यांचे वाटप : विद्यार्थी, पालक, शिक्षक व नागरिकांकडून शासनाच्या या उपक्रमाचे कौतुक

**विद्यार्थ्यांना शाळेमध्ये दाखले देण्याचा उपक्रम स्तुत्य......**

ग्रमीण भागातील पालक हा आपआपल्या कामामुळे व्यग्र असतो. यातून पाल्याच्या कागदपत्रांसाठी धावपळ करताना त्याची मोठी तगमग तर होतेच परंतु वेळही वाया जातो. याची दखल घेवून शाळेमध्ये विद्यार्थ्यांना दाखले देण्याचा शासनाचा उपक्रम स्तुत्य आहे. तर हा उपक्रम रोपळे विद्यालयामध्ये राबवून मंडल अधिकारी बाळासाहेब कदम आणि त्यांच्या टिमने विद्यार्थ्यांप्रती कर्तव्याची भुमिका पार पाडली आहे. **औदुंबर गायकवाड,रोपळे ता.पंढरपूर**

**पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूजः** शासनाच्या विविध योजनांचा लाभ हा विद्यार्थी आणि नागरिकांना होत असतो. यासाठी लागणारी कागदपत्रेही तेवढ्या सुलभतेने उपलब्ध व्हावीत यासाठी शासन स्तरावर विविध अभियान राबवण्यात येत आहेत. त्याच बरोबर सध्या प्रवेशाचा कालावधी सुरू असल्याने विद्यार्थ्यांना आवश्यक असणारी कागदपत्रे तात्काळ देण्यात यावीत. यासाठी तहसीलदार यांच्या मार्गदर्शनाखाली थेट शाळेमध्ये जावून विद्यार्थ्यांना दाखले वाटप उपक्रम राबवण्यात येत असून त्यास चांगला प्रतिसाद मिळत आहे. असे प्रतिपादन रोपळे मंडलचे मंडल अधिकारी बाळासाहेब कदम यांनी केले.

पंढरपूर तालुक्यातील रोपळे येथील श्री शिवाजीभाऊ बाबा पाटील विद्यालयामध्ये आयोजीत करण्यात आलेल्या दाखले वाटप शिबीराप्रसंगी मंडल अधिकारी बाळासाहेब कदम बोलत होते. यावेळी काचरे, बागवान, चव्हाण, तपसे, जनहित शेतकरी संघटनेचे औदुंबर गायकवाड, ग्रा.प.सदस्य विलास भोसले, मुख्याध्यापक औदुंबर गायकवाड, विनायक निंबाळकर, नानासाहेब गायकवाड, छत्रपती महा ई सेवा केंद्राचे अभिजीत भोसले, महादेव रितोंड, तलाठी दांडगे, रोपळे मंडलातील महा ई सेवा केंद्र चालक उपस्थित होते. पुढे बोलताना बाळासाहेब कदम म्हणाले कि, शासनाच्यावतीने राबवण्यात येणार्या उपक्रमांसाठी लोकसहभाग महत्वाचा असून या लोकसहभागामुळे विविध अभियान हे यशस्वी होताना दिसून येत आहे. कोणतीही कागदपत्रे नसल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान होवू नये याची दखल घेवून शासनाच्या माध्यमातून दाखले वाटप शिबीर होत आहेत. त्याचा फायदा पालकांना होत असून कागदपत्रे जमवण्यासाठी त्यांची होणारी धावपळ आणि वेळेची बचत होत आहे. यामुळे विद्यार्थी, पालक, शिक्षक व नागरिकांकडून शासनाच्या या उपक्रमाचे कौतुक होत आहे. असेही कदम यांनी सांगितले.

आयोजीत करण्यात आलेल्या शिबीरामध्ये रोपळे विद्यालयातील विद्यार्थ्यांना वि विध २५० दाखले देण्यात आले. तर यावेळी उपस्थित अधिकार्यांनी विद्यार्थ्यांना कागदपत्रांबाबत माहिती दिली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विकास आदमिले व शाळेतील शिक्षकांनी परीश्रम घेतले.

# जुन्या पेन्शनच्या प्रश्ना सह टप्पा अनुदानाचा प्रश्न निकाली काढणार : मुख्यमंत्री शिंदे

**निफाड/दैनिक यशसिध्दि न्यूज**



नाशिक शिक्षक मतदार संघ महायुतीचे उमेदवार किशोरभाऊ दराडे यांच्या निवडणूक प्रचारासाठी नाशिक हॉटेल एुींशीी ळप येथे सभेला उपस्थित होते . त्यावेळी किशोरभाऊ दराडे यांनी जुनी पेन्शन योजना राज्यभर गाजवली त्यासाठी धरणे, आंदोलन, पायी दिंडी, उपोषण इ जनांदोलन तसेच सुप्रिम कोर्टापर्यंत कायदयाची लढाई लढवली . एकच मिशन जुनी पेन्शन योजना, टप्पा अनुदान मंजूर करून घेतले, प्रलंबीत बिलासाठी भरघोस निधी १६५० कोटी उपलब्ध करून दिला, आश्रमशाळा वेळेत बदल, पी एफ हिशोब, वेळेवर पगार आश्र्वासीत योजना, शिक्षण सेवक*

मानधनात वाढ, कंत्राटी भरती रदद, प्रलंबीत फरक, मेडीकल, इ साठी १५०० कोटी, दर्मचारी मान्यता, शालार्थ आयडी, अनुकंपा इ प्रश्र्न शिक्षक दरबार इ गोष्टी माध्यमातून कामे केलेली आहे त्याचा सततचा पाठपुराव्याला यश आले .त्यांचा विजय निश्र्चीत होइल अशी खात्री वाटते असे उदगार काढले . शाळाना संगणक प्रिटर हायमास्ट पुस्तके इ . गोष्टीचे वाटप केले .जुन्या पेन्शनचा प्रश्र्न लवकरच निकाली काढणार असे* ठासून सांगीतले . यावेळी विविध मान्यवर उपस्थित होते . नाशिकचे पालकमंत्री दादाजी भूसे ,आमदार श्रीमती सिमाताई हिरे ,आमदार श्रीमती देवयांनी फरांदे, मा खासदार हेमंत गोडसे , मा .आमदार बाळासाहेब सानप , प्रकाश लोंढे लक्ष्मण सावजी, अजय बोरस्ते अतुल सावे, हेमंत धात्रक इ मंचवर उपस्थित होते . यावेळी नाशिक जिल्हा मुख्याध्यापक संघाच्या वतीने किशोरभाऊ दराडे यांना पाठींब्याचे पत्र मुख्यमंत्र्यांना देण्यात आले व जुनी पेन्शन योजना त्वरीत लागू करावी याबाबतचे निवेदन देखील देण्यात आले यावेळी मुखाध्यापक संघाचे* सर्व पदाधिकारी अध्यक्ष - श्री एस के सावंत, सचिव - एस बी देशमुख, उपाध्यक्ष - प्रदिप सांगळे , सुनिल आहेर, बी एन देवरे , दीपक व्याकीज ,नागरे बी के, साहेबराव कुटे, श्री अनिल माळी, परवेजा शेख ,भागीनाथ घोटेकर, इ उपस्थित होते*

# नवीन शैक्षणिक धोरणामुळे शिक्षण व्यवस्थेतील मरगळ झटकली जाईल : प्राचार्य डॉ. आबासाहेब देशमुख

**पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

शैक्षणिक क्षेत्राला आलेली मरगळ नवीन राष्ट्रीय धोरणामुळे झटकली जाईल. विद्यार्थ्यांना ज्ञानासोबतच कौशल्य प्राप्त होईल. त्यामुळे शिक्षणातून विद्यार्थ्यांना नोकरीसाठी आणि व्यवसायासाठी असणारी कौशल्ये संपादन करता येतील. विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षण मिळावे. ज्ञान संपादनासाठी कला, वाणिज्य, विज्ञान अशी कोणत्याही प्रकारची मर्यादा असणार नाही. विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती वाढावी यासाठी त्यात तरतूद करण्यात आली आहे. ज्ञानाच्या क्षेत्रात विद्यार्थ्यांना समृद्ध बनविण्यासाठी प्राध्यापकांनी सकारात्मक दृष्टीने बदल स्वीकारले पाहिजेत असे प्रतिपादन प्राचार्य महासंघाचे प्रदेशाध्यक्ष डॉ. आबासाहेब देशमुख यांनी केले.



रयत शिक्षण संस्थेच्या येथील कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालय आणि सोलापूर विद्यापीठ शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने रुसा काम्पोनंट ८ अंतर्गत आयोजित 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' या विषयावरील विद्यापीठस्तरीय एक दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे, प्राचार्य डॉ. धीरजकुमार बाड, प्राचार्य डॉ. औदुंबर जाधव, प्रा. डॉ. पंचाप्पा वाघमारे, प्रा.डॉ. हनुमंत आवताडे, प्रा. डॉ. भगवान अधटराव आदी मान्यवर उपस्थित होते. प्राचार्य डॉ. आबासाहेब देशमुख पुढे म्हणाले की, इंग्रजांनी त्यांच्या सोईनुसार शिक्षण पद्धती भारतात आणली. तेंव्हापासून ती पद्धती बदलली गेली नाही. ज्ञानाच्या क्षेत्रात भारताचे प्रभुत्त्व निर्माण होण्यासाठी अशा स्वरूपाची शिक्षण पद्धती गरजेची होती. भारतीय हा ज्ञानाच्या क्षेत्रात प्रभाव निर्माण करू शकतो. अमेरिकेतील सर्वोच्च असणाऱ्या महाविद्यालयाचे पन्नास टक्के प्राचार्य हे भारतीय आहेत. त्यामुळे बदललेली शैक्षणिक पद्धती ही देशाला विकासाच्या टप्प्यावर घेवून जाण्यास मदत करेल. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे म्हणाले की, कोणत्याही नवीन बदलास आपण विरोध करण्याऐवजी त्याचा स्वीकार सकारात्मकतेने केला तर त्याचा अधिक चांगला परिणाम होतो. सध्या भारताचा संशोधनावर होणारा खर्च हा एकूण आर्थिक बजेटच्या एक टक्क्याहून कमी आहे. इस्राईलसारखा देश एकूण उत्पन्नाच्या सात टक्के खर्च संशोधनावर करतो. जागतिक स्तरावर शैक्षणिक क्षेत्रात प्रभुत्त्व निर्माण करण्यासाठी आपणास अनेक धोरणात बदल करावे लागतील. शैक्षणिक क्षेत्रातील हा बदल देशाला निश्र्चितच चांगल्याप्रकारे मार्गक्रमण करणारा ठरेल.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुटा संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ. नेताजी कोकाटे यांनी केले. या कार्यशाळेस पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ कार्यक्षेत्रातील दोनशेहून अधिक प्राध्यापक आणि प्राचार्यांनी सहभाग नोंदविला. प्रा. डॉ. शिवाजी वाघमोडे आणि प्रा. डॉ. राजेंद्र सूर्यवंशी यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. अमर कांबळे यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. सुशील कुमार शिंदे यांनी मानले. ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी प्रा. डॉ. रमेश शिंदे, प्रा. डॉ. समाधान माने, प्रा. डॉ. दत्तात्रय काळेल, प्रा. डॉ. दत्तात्रय चौधरी, अभिजित जाधव, अमोल माने यांनी विशेष परिश्रम घेतले.

# ना.रामदास आठवले यांच्या भगीनीदिवंगत शकुंतला आठवले ऊर्फ सखुताई यांच्या पार्थिवावर चेंबूर येथे अंत्यसंस्कार



**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज :** रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांच्या भगीनी शकुंतला आठवले ऊर्फ सखुताई यांचे काल दि.२३ जुन रोजी रात्री ११ वाजता वयाच्या ७७व्या वर्षी हदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.चेंबुर मधील सुश्रुत रुग्णालयात त्या गेल्या आठ दिवसापासुन दाखल होत्या.काल रात्री हदयविकाराचा तिव्र झटका आल्याने त्यांचे रुग्णालयातच निधन झाले.सखुताई यांच्या निधनाची दु: खद वार्ता कळताच रिपब्लिकन पक्षात शोककळा पसरली.ना.रामदास आठवले यांनी दिल्लीतील कामकाजात बदल करुन ते तातडीने मुंबई ला येऊन दिवंगत शकुंतला आठवले उर्फ सखुताई यांच्याअंत्यविधी उपस्थित राहिले .दिवंगत शकुंतल आठवले यांच्या पर्थिवावर ना.रामदास आठवले यांच्या हस्ते अग्निसंस्कार करण्यात आले.यावेळी भदंत राहुल बोधी यांनी बौध्द पद्धतीने अंत्यसंस्कार विधी केला. बौद्धाचार्य म्हणून प्रकाश जाधव ; सोना कांबळे उपस्थित होते. २४ जुन रोजी सायंकाळी ६ वाजता चेंबूर च्या चरई स्मशानभुमीत दिवंगत शकुंतला आठवले ऊर्फ सखुताई यांच्या पार्थीव देहावर बौध्दध्दतीने अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.चेंबुर मधील शेल कॉलनी येथील एव्हरेस्ट सोसायटी जैतवन उद्याना समोर दिवगंत शकुंतला आठवले ऊर्फ सखुताई यांच्या पार्थीव आज दुपारपासुन अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले आहे.शेल कॉलनी ते चरई स्मशानभुमी पर्यंत दिवगंत शकुंतला आठवले ऊर्फ सखुताई यांची अंत्ययात्रा काढण्यात येणार आहे.या अंत्ययात्रेत रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष ना. रामदास आठवले सहकुटुंब उपस्थित राहणार आहेत.आंबेडकरी चळवळीतील रिपब्लिकन चळवळीतील अनेक मान्यवर कार्यकर्ते दिवगंत शकुंतला आठवले ऊर्फ सखुताई यांना शेवटची भावपूर्ण श्रध्दांजली अपर्ण करण्यासाठी त्यांच्या अंत्ययात्रेत उपस्थित राहणार आहेत.

येत्या दि.३० जून रोजी सकाळी १० वाजता दिवंगत शकुंतला आठवले उर्फ सखू ताई यांचा जलदान विधी आणि पुण्यानुमोदन कार्यक्रम शेल कॉलनी समाज मंदिर सभागृह चेंबूर येथे आयोजित करण्यात आली आहे. दिवगंत शकुंतला आठवले ऊर्फ सखुताई यांच्या निधनामुळे रिपब्लिकन चळवळीवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. केंद्रीय राज्यमंत्री

सर्व कार्यकर्त्यांना त्यांनी मोठ्या बहीणीची माया दिली.त्यांचा स्वभाव प्रेमळ मायाळु होता.ना.रामदास आठवले यांच्या बालपणाच्या आठवणी त्यांनी जपल्या होत्या.त्यांना आपल्या भावा बद्दल म्हणजेच रामदास आठवलेंबद्दल प्रचंड अभिमान होता.दिवगंत शकुंतला आठवले ऊर्फ सखुताई यांच्या निधनामुळे रामदास आठवले यांच्यावरील मातृतुल्य बहीणीची माया; ममतेची सावली हरपली आहे. शकुंतला आठवले ऊर्फ सखुताई यांच्या निधनामुळे संपूर्ण रिपब्लिकन पक्षात शोक आणि हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. दिवंगत शकुंतला आठवले यांच्या अंत्ययात्रेत रिपाइं चे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री ना.रामदास आठवले; त्यांच्या पत्नी सौ सीमाताई आठवले; कुमार जित आठवले; रिपाइंचे राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर ; राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे; मुंबई अध्यक्ष सिद्धार्थ कासारे; युवक आघाडी महाराष्ट्र अध्यक्ष पप्पू कागदे; पश्रि्चम महाराष्ट्र अध्यक्ष सूर्यकांत वाघमारे; उत्तर महाराष्ट्र चे अध्यक्ष प्रकाश लोंढे; सुरेश बार्शींग ; दयाळ बहादुरे; सौ शिलाताई गांगुरडे संगीता आठवले; डी एम चव्हाण; बाळासाहेब गरूड; घनश्याम चिरणकर; श्रीकांत भालेराव; दादू झेंडे; सुनील मोरे; संजय डोळसे; रवी गायकवाड;चंद्रशेखर कांबळे ; ऋषी माळी; महादेव साळवे; अजित रणदिवे; अनिल भाई गांगूरडे, साधू कटके ;बाबा काळे;अभाया सोनवणे; ममता अधांगळे; उशा रामलू; रेश्मा खान; उदयराज तोरणे आदिनाग रणधीर; सुनील गमरे; विनोद जाधव सचिन कासारे आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

# लोकशाहीच्या मंदिराला सोलापूरच्या नवनिर्वाचित खा.प्रणिती शिंदे यांच्या कडून आदर पूर्वक नमन

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोलापूर/विजय घनघावः प्रणितीताई शिंदे ह्या लोकशाहीचे मंदिर असलेल्या संसद भवनात खासदार म्हणून पहिल्यांदा पाऊल टाकताना संसद भवनाच्या प्रवेशद्वारासमोर नतमस्तक झाल्या.प्रणितीताई शिंदे ह्या लोकशाहीचे मंदिर असलेल्या संसद भवनात खासदार म्हणून पहिल्यांदा पाऊल टाकताना संसद भवनाच्या प्रवेशद्वारासमोर नतमस्तक झाल्या.नवनिर्वाचित खासदार प्रणितीताई शिंदे ह्या गेल्या पंधरा वर्षांपासून आमदार म्हणून जनतेची सेवा करत असताना सोलापूर लोकसभा मतदारसंघातील नागरिकांनी विश्र्वास आणि मतरूपी दिलेले आशीर्वादामुळे पहिल्यांदाच खासदार म्हणून प्रतिनिधित्व करण्याचे आणि सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्र्न संसदेत मांडण्याची संधी मिळाली. याचा उपयोग सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्र्न मार्गी लावण्यात यश मिळावे अशी मनोमन प्रार्थना देखील शपथविधीच्या आधी



संसद भवनाच्या प्रवेशद्वारासमोर नतमस्तक होऊन केली.

# शेतकऱ्याची चिंता वाढली

**पत्रकार नामदेव निर्मळे**

टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील परिसरात जून महिना संपत आला तरी पावस पडत नाही. भुईमूग पेरणी काही शेतकऱ्यांनी केलेले आहे. जमिनीमध्ये पुरेसा ओलावा नसल्याकारणाने दुबार पेरणी करत आहेत. ऊस लागण सुद्धा थांबवण्यात आलेले आहे. म्हणाव तसे अजून विहीर, बोर, यांना पाणी आलेले नाही.

रात्रीचा दिवस करून शेतकरी मिळेल तसं पाणी एक एक सरीला पाजवत आहे. शेतकरी चिंता ग्रस्त झालेला आहे. कधी एकदा पाऊस पडतोय अशी आशा शेतकऱ्याला लागून राहिलेले आहे. पिके करपत आहेत.मुरमाड शेतीतील अनेक ठिकाणी पिके मान टाकलेली आहे. पाऊस पडावा अशी विनंती अनेक शेतकरी करत आहेत.

# गुरुजी..शाळेला यायचं कसं? सुपतगाव शाळेच्या परिसरात तळ्याचे स्वरूप...

**उमरगा/ दैनिक यशसिद्धी** उमरगा तालुक्यातील सुपतगाव येथील जिल्हा परिषद शाळेच्या परिसरात पावसाचे पाणी साचत आहे. परिसराला तळ्याचे स्वरूप आले आहे.

पाऊस झाल्यानंतर शाळेच्या मेन गेटला पाणी येते यामुळे विद्यार्थी व शिक्षकांना शाळेत पाय ठेवणे मुश्किल झाले आहे, त्यामुळे गुरुजी आता आम्ही शाळेत यायचं कसं असा प्रश्र्न मुलांत निर्माण होत आहे? सुपतगावच्या मुख्य रस्त्यावर जिल्हा परिषद शाळा, माध्यमिक शाळा व अंगणवाडी आहे, या मुख्य रस्त्यावर वर्दळ मोठ्या प्रमाणात आहे, या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडून त्यामध्ये गुडघाभर पाणी साचत आहे, याच दूषित पाण्यातून सर्वांना कसरत करत मार्ग काढत जावं लागत आहे. शालेय विद्यार्थी व ग्रामस्थांमधून ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यावर नाराजी व्यक्त केली जात आहे.

डाळिंब केंद्रांतर्गत सुपतगाव येथे जिल्हा परिषद शाळा आहे. तिथे इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतचे वर्ग भरतात. शाळेच्या मुख्य प्रवेशद्वारासमोरच मोठ्या पप्रमाणात पावसाचे दूषित पाणी साचत आहे, त्यामुळे विद्यार्थ्यांसह शिक्षकांना शाळेत जाण्यासाठी कसरत करावी लागत आहे. या साचलेल्या पाण्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. डास, मच्छर, मलेरिया, डेंगू होऊन आजारी पडत आहेत. मात्र येथील ग्रामपंचायतचे दुर्लक्ष आहे. शाळेच्या मुख्य मार्गावर जल जीवन मिशन च्या नावाखाली जागोजागी खड्डे खोदून ठेवले आहेत, खड्ड्यात पडून विद्यार्थ्यांना दुखापत होण्याची शक्यता आहे, तरी खड्डे त्वरित बुजवण्याची मागणी केली जात आहे. या समस्या बाबत वेळोवेळी ग्रामपंचायतला सांगूनही पदाधिकारी गावच्या विकासाकडे कानाडोळा करत आहे.

तरी शाळेच्या प्रवेशद्वारासमोरील पाण्याची समस्या ग्रामपंचायत कधी सोडवणार असा सवाल विद्यार्थी व पालकांतून होत आहे.

# भैरवनाथ कानडे यांना राज्यस्तरीय बसवरत्न पुरस्कार प्रदान

**दैनिक यशसिध्दि न्यूज**



वागदरी/एस.के.गायकवाडः उमरगा तालुक्यातील मुरुम येथील बसव प्रतिष्ठाण या अखिल भारतीय सामाजिक संघटनेच्या वतीने महात्मा बसवेश्र्वर जयंती उत्सवाच्या निमित्ताने शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबददल देण्यात येणारा राज्यस्तरिय बसवरत्न पुरस्कार चिकुंद्रा येथील सहशिक्षक तथा पत्रकार भैरवनाथ खंडू कानडे यांना प्रदान करण्यात आला. मुरुम येथील रत्नमाला मंगल कार्यालयात दि ( २३ ) रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत सदर पुरस्कार वितरण सोहळा पार पडला . यावेळी नागपूरचे एम्सचे अध्यक्ष तथा माजी खासदार पद्मश्री डॉ. विकास महात्मे ,एमसीआयएमचे सदस्य तथा भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष डॉ. बाळासाहेब हरपळे, लातूर जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. प्रदीप ढेले बसव प्रतिष्ठाणचे अध्यक्ष डॉ .रामलिंग पुराणे यांच्या हस्ते श्री . कानडे यांना सन्मानचिन्ह , सन्मानपत्र , शाल, पुष्पहार देवून सन्मानित करण्यात आले .

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उमरगा जनता बँकेचे चेअरमन शरण पाटील होते. यावेळी भाजपा ओबीसी महिला मोर्चा प्रदेशाध्यक्षा उज्वलाताई हाके, उमरगा विधिज्ञ मंडळ अध्यक्ष अँड. जी. के. गायकवाड, पंचायत समिती माजी सभापती सचिन पाटील, माजी नगराध्यक्ष रशीद शेख, धनगर समाज संघर्ष समिती प्रदेशाध्यक्ष अनंत बनसोडे, लातूर जिल्हा अध्यक्ष अनिल पुजारी, सातलींग स्वामी, बसव प्रतिष्ठाणचे संस्थापक अध्यक्ष डॉ. रामलिंग पुराणे आदींची प्रमूख उपस्थिती होती .भैरवनाथ कानडे हे ज्ञानकिरण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष तसेच जिल्हा मराठी भाषा समितीचे सदस्य आहेत . त्यांनी आजतागायत शैक्षणिक , सामाजिक , पत्रकारिता ,निवेदन सांस्कृतिक ,साहित्य आदी क्षेत्रात भरीव योगदान दिले असून यापूर्वी त्यांना महाराष्ट्र शासनाच्या राज्यस्तरीय सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कारासह विविध संस्था , संघटनांच्या वतीने सन्मानित करण्यात आले आहे .सदर पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे .

# शेतकरी मित्र हवामान अभ्यासक पंजाब डख यांची हभप राजेंद्र तळेकर महाराज यांच्या निवासस्थानी भेट

**दैनिक यशसिध्दि न्यूज**



बुलढाणा / राहुल साबळे : शेतकरी मित्र हवामान अभ्यासक श्री.पंजाब डख हे बुलढाणा येथे जात असताना त्यांनी त्यांचे मित्र ह.भ.प. श्री.राजेंद्र महाराज तळेकर विदर्भ अध्यक्ष महाराष्ट्र राज्य वारकरी महामंडळ यांच्या चिखली निवासस्थानी सदिच्छा भेट दिली त्या प्रसंगी चिखली कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापती श्री.राम खेडेकर इंजिनिअर म्हात्रे साहेब यांच्या उपस्थितीत श्री. तळेकर महाराज यांनी वारकरी महामंडळ यांच्या वतीने श्री. पंजाब डख हवामान अभ्यासक यांचा सत्कार केला चिखली कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्या वतीने उपसभापती श्री.राम खेडेकर यांनी सुध्दा सत्कार केला शेतकरी हितासाठीच अहोरात्र मेहनत घेणारे श्री. डख साहेब यांच्या समवेत पाऊस पाणी संदर्भात संगोपन चर्चा झाली. हवामान अभ्यासक यांनी अचूक हवामान अंदाज देऊन शेतकरी वर्गासाठी वेळोवेळी केलेल्या सुचना ह्या खुपच महत्त्वाच्या आहेत. यावर्षी बुलढाणा जिल्ह्यातील हवामान कसे असेल हे वेळोवेळी आपणास माहीती देण्यासाठी फोन करा शेतकरी, कष्टकरी, वारकरी यांच्या वर जिवापाड प्रेम करतो माझ्यासाठी शेतकरी हित हा विषय आंनद देणारा आहे. त्यामुळे मी पायाला भिंगरी बांधून राज्य भर फिरतो वारकरी संप्रदायातील साधुसंतांच्या कृपा आशिर्वादाने निरपेक्ष वृत्तीने काम करताना मिळणारे समाधान मि शब्दात सांगु शकत नाही भविष्यात नवनवीन तंत्रज्ञान विकसित करुन प्रत्येक शेतकरी माझ्या सोबत जोडल्या जाईल व निसर्गाच्या लहरीपणामुळे होणारे परिणाम हे टाळण्यासाठी माझे प्रयत्न आहे. असे विचार श्री.पंजाब डख यांनी मांडले मातृतीर्थ बुलढाणा असे श्री.डख म्हणाले.र


# पंढरपूर उप माहिती कार्यालयातील रद्दी विक्री बाबत आवाहन

**पंढरपूर /दैनिक यशसिध्दि न्यूजः** जिल्हा माहिती कार्यालय, सोलापूर अधिनस्त उप-माहिती कार्यालय पंढरपूर या कार्यालयातील मराठी दैनिके, साप्ताहिके तसेच इतर किरकोळ जमा झालेली रद्दी विक्री करावयाची आहे. त्यासाठी जिल्ह्यातील विक्रेत्यांकडून दर पत्रके मागविण्यात येत आहेत. तरी ज्यांना वृत्तपत्राची रद्दी घ्यावयाची आहे. त्यांनी आपली दरपत्रके २८ जून २०२३ पर्यंत कार्यालयीन वेळेत बंद लिफाफ्यात द्यावीत. लिफाफ्यावर रद्दी दर पत्रके असा उल्लेख असावा. मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकांचा स्वीकार केला जाणार नाही असे आवाहन जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर यांनी केले आहे. दरपत्रके पाठविण्यासाठी कार्यालयाचा पत्ता- जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, नवीन मध्यवर्ती प्रशासकीय इमारत,तळमजला, क विभाग जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर-४१३००१ तसेच उप-माहिती कार्यालय, भक्ती मार्ग, पत्रकार नगर, कनकाक्षर बंगला, हॉटेल दुर्वांकर शेजारी पंढरपूर ता.पंढरपूर. जि.सोलापूर. कार्यालयाचा दुरध्वनी क्रमांक ०२१७- २७३१०४०, २७३१०४१ व ०२१८६- २९५९१४ असा आहे.

# कर्तव्यात कसूर करुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा काढून टाकणाऱ्या अधिकाऱ्यांचा प्रश्न विधीमंडळात मांडा

## पुरंदर तालुका समन्वय समितीच्या बैठकीत विष्णूदादा भोसले यांची मागणी

**पुरंदर/दैनिक यशसिध्दि न्यूज**



भारतीय संविधानाचे निर्माते विश्र्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा जेजुरी तालुका पुरंदर जिल्हा पुणे येथील पुतळा पुरंदर तालुक्यातील मनूवादी विचारांच्या अधिकार्यांनी कोणालाही विश्र्वासात न घेता काढून टाकला आहे, त्यामुळे अशा कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांचा प्रश्र्न राज्याच्या विधीमंडळ अधिवेशनात मांडा , अशी आग्रही मागणी पुरंदर हवेली चे लोकप्रतिनिधी आमदार संजय जगताप यांच्याकडे केली, आमदार संजय जगताप यांच्या अध्यक्षतेखाली आचार्य अत्रे सभागृह सासवड येथे पुरंदर तालुका समन्वय समितीची बैठक पुरंदर तालुक्यातील सर्व विभागांचे अधिकारी यांच्या उपस्थितीत घेण्यात आली यावेळी, यावेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले श्रमिक ब्रिगेडचे प्रदेश सरचिटणीस विष्णूदादा भोसले यांनी वरील मागणी केली, यावेळी बोलताना बोलताना विष्णूदादा भोसले म्हणाले की, १४ जून २०२४ रोजी जेजुरी येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा, पुरंदर तालुका उपविभागीय अधिकारी तथा प्रांत, पुरंदरचे तहसिलदार , भोर उपविभागीय पोलीस अधिकारी, जेजुरी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी , व जेजुरी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक, व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अभियंता यांनी संगनमताने तालुक्यातील राजकीय पक्ष सामाजिक संघटना लोकप्रतिनिधी आंबेडकरी अनुयायांनी पत्रकार यांना कसलीही माहिती न देता, कार्यालयीन वेळ नसताना दि. १४ जून २०२४ रोजी कोणतीही विधीव्रत पुजा-अर्जा न करता, सकाळी ७ - ०० वाजता बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा काढून टाकला आहे, त्यामुळे पुरंदर तालुक्यासह महाराष्ट्रातील आंबेडकरी अनुयायांच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत,व महामानवाच्या पुतळ्याची विटंबना झाली आहे, आंबेडकरी जनतेच्या वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या पुनर्वसनासाठी नवीन पर्यायी जागा देण्यात यावी व नवीन जागा दिल्याशिवाय बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास हात लावू नये , असे अनेक वेळा लेखी निवेदन देऊनही पुरंदर प्रशासनाने चोर दरोडा टाकतात या प्रमाणे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा काढून टाकला आहे, त्यामुळे अशा कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई होणे आवश्यक आहे, त्यामुळे आमदार संजय जगताप यांनी हा प्रश्र्न विधानसभेत मांडावा अशी आग्रही मागणी विष्णूदादा भोसले, यांनी केली यावेळी विविध गावचे सरपंच उपसरपंच विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी व तालुक्यातील नागरिक मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते,

यावेळी विविध शासकीय कार्यालयातील नागरीकांच्या प्रश्र्नावर चर्चा करण्यात आली, यावेळी आमदार संजय जगताप यांनी नागरीकांच्या कामाचा निपटारा करण्यात येईल, व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा काढून टाकण्यात आला आहे, हा प्रश्र्न विधीमंडळात मांडला जाईल, असे आश्र्वासन दिले,